: प्रकरण 1 ले :

# भारतीय पक्ष पद्धती व भारतीय राजकारणात कम्युनिस्ट पक्षाची विचारसरणी व स्थान

: प्रकरण पहिले :

# "भारतीय पक्ष पद्धती व भारतीय राजकारणात कम्युनिस्ट पक्षाची विचारसरणी व स्थान"

"प्रातिनिधिक लोकशाहीच्या विकासाबरोबरच प्रातिनिधिक लोकशाहीला पूरक ठरणाऱ्या राजकीय पक्ष, दबावगट, वृत्तपत्रे, लोकमत इत्यादी सारख्या संस्था पाश्चात्य देशात उदयास आल्या आणि विकसित झाल्या. उदा.इंग्लंड, अमेरिका या देशांत या संस्थाचा उदय झाला आणि तिचा प्रसार व प्रचार जगभर झाला. जगातील अनेक देशानी लोकशाही शासन संस्थेचा स्विकार केला. भारतामध्ये संसदीय लोकशाहीचा स्विकार झाला आणि विशाल व विस्तृत अशा लोकशाही प्रक्रियेस सुरुवात झाली.

"आधुनिक लोकशाही राज्यांत राजकीय पक्षांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्रातिनिधिक लोकशाही राज्यांत राजकीय पक्षांना महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागते. कारण निवडणूक काळात मतदारामध्ये जागृती निर्माण करण्याचे काम राजकीय पक्ष करीत असतात."[1] राजकीयदृष्टया देश जागृत ठेवण्याचे काम आणि मतदारामध्ये राजकीयदृष्टया आवड निर्माण करण्याचे काम ते करतात.

"लोकशाही शासनपद्धतीत जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत राज्यकारभार चालतो. जनतेच्या संमतीतून आणि टिकेतून लोकशाहीचा कारभार चालतो."[2]

कित्येक लोकांना राजकीय पक्ष आवडत नाहीत कारण त्यांच्या मतानुसार राजकीय पक्ष महत्त्वाचे नसून ते अनावश्यक वाद निर्माण करतात. आपल्या निरोपाच्या भाषणात अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जार्ज वॉशिंग्टन अमेरिकन लोकांना राजकीय पक्षांच्या निर्मिती विरुद्ध सल्ला दिला पण

लवकरच हॅमिल्टनच्या नेतृत्वाखाली रिपब्लीकन पक्ष आणि जेफरसनच्या नेतृत्वाखाली डेमॉक्राटीक पक्षांचा उदय झाला. राजकीय पक्षामध्ये अनेक तोटे असले तरी त्यांनी लोकशाहीच्या वाढीसाठी दिलेले योगदान महत्वाचे आहे.

लॉवेल यांनी असे म्हटले आहे कि, कोणत्याही मोठया देशांत सर्व लोकांकडून सरकारची कल्पना अशक्यप्राय आहे. मताधिकार हे व्यापक असतात. खरोखर नियंत्रण हे पक्षाच्या हाती असले पाहिजे किंवा बहुतांशी लोकांच्याकडे असले पाहिजे.

सत्ताप्राप्तीसाठी व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या पक्षाचे सभासदत्व स्विकारावे लागते. व्यक्तीगत राजकारणाला आज काहीही महत्त्व उरले नसून पक्षपद्धतीचे राजकारण सर्वत्र सुरु झाले आहे. लोकशाही शासन पद्धतीत राजकीय पक्षांची नितांत आवश्यकता असते. मन्रोच्या मते, स्वतंत्र राजकीय पक्षांकडून चालविले जाणारे शासन हे लोकशाही म्हणून ओळखले जाते. राजकीय पक्ष नसेल तेथे लोकशाही नाही (No Party, No Democracy) असे मन्रोने म्हटले आहे. लोकांच्या इच्छा, आकांशा, अपेक्षा प्रकट करण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणजे राजकीय पक्ष होय. राजकीय पक्षाशिवाय निर्माण होणारे शासन कमकुवत व अकार्यक्षम असते असे मत डॉ.फायनर यांनी मांडले आहे. कोणतीही राजकीय व्यवस्था म्हटले की पक्षीय राजकारणाशिवाय तिला महत्त्व प्राप्त होत नाही. मग साम्यवादी शासनपद्धती असो किंवा हुकूमशाही शासन पद्धती असो.

<u>राजकीय पक्ष</u> :-

राज्याची सत्ता मिळवून आपल्या ध्येयधोरणांची अमंलबजावणी करु शकणारी मतदारांची लढाऊ संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय. कोणत्याही राजकीय पक्षात अनेक सभासद

असतात. पक्षाचे विशिष्ट ध्येयधोरण असते. या ध्येयधोरणांच्या बाबतीत पक्ष सभासदांत सर्वसाधारण एकवाक्यता असते. राजकीय पक्ष आपापले ध्येयधोरण जनतेसमोर मांडून घटनात्मक मार्गाने राज्याची सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करतात. सत्तेवर आल्यावर आपले ध्येयधोरण अंमलात आणण्याचा प्रयत्न करतात.

1. एडमंड बर्क - "राजकीय पक्ष म्हणजे मतैक्य असणारा आणि सामूहिकरित्या राष्ट्रीय हिताची जोपसना करणारा लोकांचा एकत्रित आलेला समूह होय"[3]

**According to Edmund Burke, "A Political party is a body of men united for promoting by joint endeavours the national interest upon some political principle in which they agreed."**

2. प्रो.गेटेल - "राजकीय पक्ष म्हणजे लोकांची अशी संघटना कि जी आपल्या सर्वसाधारण धोरणांची अमंलबजावणी करण्यासाठी मतदानाचा हक्क वापरुन शासनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करीत असते."[4]

**According to Getell, "A political party consists of a group of citizens more or less organised who act as political unit and who by the use of their voting power aim to control the government and carry out their general policies."**

3- प्रो.मॅक आयव्हर "एखाद्या तत्वाला किंवा धोरणाला पाठिंबा देण्यासाठी संघटित झालेली आणि घटनात्मक मार्गाने ते धोरण शासनाचे धोरण व्हावे यासाठी प्रयत्न करणारी संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय"[5]

According to MacIver "A political party is association organised in supper of some principle or policy which by constitutional means it endevours to make the determinant of government."

4- गिलख्रिस्ट- "राजकीय पक्ष म्हणजे नागरिकांचा संघटित झालेला असा समूह की जो समान ध्येयाने प्रेरित होऊन राजकीयदृष्टया शासनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करीत असतो.[6]

Gilchrist says, 'A political may thus be defined as an organised group of citizens who prefers to share the same political views and by action as a political unity try to control government.

समाजात विशिष्ट राजकीय तत्वज्ञानाचा पुरस्कार करण्यासाठी राजकीय पक्ष निर्माण झालेले दिसतात. राजकीय पक्षाला निरनिराळी कार्ये करावी लागतात. निवडणुकीकरिता पक्षांच्या उमेद्वारांची निवड करावी लागते. पक्षांच्या तत्वज्ञानाचा व ध्येयधोरणांचा लोकांत प्रचार करावा लागतो. तसेच निवडणूका देखील लढवाव्या लागतात. निवडणूकीत बहुमत प्राप्त झाल्यास आणि सत्ता हाती आल्यावर सरकारी यंत्रणेद्वारा पक्षाच्या ध्येयधोरणाची अमंलबजावणी करावी लागते. बहुमत प्राप्त न झाल्यास राजकीय पक्ष विरोधी पक्षाची भूमिका पार पाडतो. अशारीतीने राजकीय पक्ष हा व्यक्ती व सरकार यांना जोडणारा एक दुवा आहे. प्रत्येक राजकीय पक्ष जनतेच्या पाठिंब्यावर कमी अधिक प्रमाणात सत्तेत सहभागी होत असतो.

**पक्षपद्धती :-**

वेगवेगळया देशात निरनिराळया पक्षपद्धती आहेत. राजकीय पक्ष मानवाच्या

समूहवृतीतून एकाच ध्येयाने किंवा उद्दिष्टाने प्रेरित झालेले लोक कार्य करीत असतात. वेगवेगळया देशांत पक्ष पद्धतीचा विकास व उदय हा त्या देशांच्या राजकीय बदलाबरोबर झालेला आहे. उदा.इंग्लंड आणि अमेरिका या देशात द्विपक्षपद्धती आहे. रशिया व चीन इ. देशात साम्यवादी पक्षपद्धत आहे. तर भारत व फ्रान्स इत्यादी देशांत बहुपक्षपद्धत आहे.

## <u>भारतीय पक्ष पद्धतीचा विकास</u> :-

"पाश्चात्य धर्तीच्या राजकीय रचना (संस्था) जरी घटनाकारांनी भारतात निर्माण केल्या तरी तिथल्यासारखी पक्षपद्धती मात्र येथे उत्क्रांत होऊ शकलीच नाही. मताधिकार जेव्हा क्रमाक्रमांने विस्तारत जातो. तेव्हा विचारसरणी, हितसंबंध, कार्यक्रम या आधारावर राजकीय पक्ष आकार घेत असतात."[7] भारतात एकाच वेळी हजारो नागरिकांना मताधिकार प्राप्त झाला. त्यामुळे वरील प्रक्रिया घडून येण्यास अवकाशच मिळाला नाही. इथल्या राजकीय पक्षांच्या कामकाजात वैचारिक सुसूत्रता, सातत्य वा सुसंगती बहुधा आढळत नाही.

"स्वातंत्र्य आंदोलन एकूण पाश्चात्य धर्तीच्या पक्ष पद्धतीला जन्म देण्याच्या दृष्टीने प्रतिकूल ठरत असते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पक्ष फुटतात. पण यातून सुसंबद्ध राजकीय पक्ष उभे न राहता फक्त राजकीय वर्तुळे निर्माण होतात. भारतात हेच घडून आहेल. स्वातंत्र्यापूर्वी अस्तित्वात आलेली 1885 ची इंडियन नॅशनल काँग्रेस ही सर्वसमावेशक छत्री होती. या चळवळीचे रुपांतर स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय पक्ष स्वरुपात झाले. मात्र तिचे चळवळ हे स्वरुप कधीच पूर्णतया नष्ट होऊ शकले नाही."[8] चळवळीचे राजकीय पक्षात रुपांतर जिथे होते तेथे एक पक्ष पद्धती निर्माण होणे अपरिहार्य ठरते.

"1945 मध्ये कम्युनिस्टांना काँग्रेसमधून बाहेर काढण्यात आले. 1934 साली काँग्रेस अंतर्गत तयार झालेला काँग्रेस समाजवादी गट 1948 साली काँग्रेस मधून बाहेर पडला. 1951 मध्ये आचार्य कृपलानी यांनी काँग्रेसचा त्याग करुन किसान मजदूर पक्ष स्थापन केला. 1959 साली चक्रवर्ती राजगोपालचारी काँग्रेसमधून बाहेर पडले व त्यांनी स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. अशा प्रकारे काँग्रेसच्या विभाजनामधून इथल्या बहुतेक पक्षाची स्थापना झाली."[9]

स्वातंत्र्य पूर्व काळामध्ये स्वातंत्र्य प्राप्त हे एकमेव उद्दिष्ट असल्याने येथील अनेक विचारी मानवी समूहाने काँग्रेसचे नेतृत्व मान्य केले आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात योगदान दिले. पण स्वातंत्र्य उत्तर काळात काँग्रेसचे वेळोवेळी विभाजन झाले. आणि विविध राजकीय पक्ष निर्माण झाले आणि इथल्या राजकीय प्रवाहात सामील झाले.

**<u>भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा उदय</u> :-**

"साम्यवादी गटांची बांधणी भारतात तुरळक स्वरुपात 1921 पासून झाली असली तरी साम्यवादी पक्ष अस्तित्वात आला तो 1925 साली कानपूर येथे झालेल्या पहिल्या साम्यवादी संमेलनात सेंट्रल कमिटी झाली तेव्हाच. कॉमिन्टर्नच्या तिसऱ्या अधिवेशनापासून भारतीय साम्यवादी चळवळीने प्रेरणा व दिशा घेतली होती."[10] 1930 साली तो कॉमिन्टर्नशी संलग्न झाला. "पक्ष म्हणून देशाच्या राजकारणात अधिकृतपणे 1933 पासून साम्यवादी पक्ष भाग घेवू लागला. तत्पूर्वी त्याचे सदस्य काँग्रेसमध्येच कार्य करीत असत."[11]

"सोव्हिएट रशियात साम्यवादाचा उदय झाल्यापासून कामगार संघटनेवर सरकारचं

बारीक लक्ष असायचं. कामगार चळवळीचा वापर पुढे राजकीय लढयाचं शस्त्र म्हणून होईल ही भिती सरकारला भेडसावत होती. रशियात जशी साम्यवादी कामगार वर्गाने झारच्या अनियंत्रित सत्तेवर मात केली तशीच ब्रिटीश साम्राज्यशाही भारतीय कामगार चळवळीमुळे पुढे मागे धोक्यात येवू नये याची काळजी सरकारला घ्यायची होती. 1925 मध्ये स्थापन झालेल्या भारतीय कम्युनिस्ट पार्टीने 1928 पासून कामगारांमध्ये प्रत्यक्ष संघटना बांधायला सुरुवात केली. अर्थात स्वतंत्र किंवा काँग्रेसशी संलग्न कामगार संघटना तयार व्हायला त्या आधीच प्रारंभ झाला होता. काँग्रेसच्या प्रेरणेने आयटक ची स्थापना 1921 मध्ये मुंबईत झाली. त्यापूर्वी म्हणजेच 1917 मध्ये स्वत: गांधीजीनी अहमदाबादचा मजदूर संघ स्थापन केला.

1902 मध्ये 1533 कारखाने होते. त्यात 5,41,634 कामगार गुंतले होते. सन 1922 मध्ये दोन दशकात कारखान्याची संख्या तिपटीहून जास्त झाली, तर मजूराची संख्या अडीच पटीने वाढली. 1930 मध्ये कारख्यान्याची संख्या 8848 तर कामगार संख्या 15,28,302 एवढी होती. साहजिकच सहज संघटित करता येण्याजोगी एक वर्ग शक्ती म्हणून कामगारांकडे राजकीय पक्षाचे लक्ष वळलं होते. कीर्ती, मजदूर, किसान स्पार्क, क्रांती अशी डाव्या विचारांची वर्तमानपत्र श्रमिक वर्गात लोकप्रिय झाली होती."[12]

"1928 सालात देशात दोनशे तीन (203) संप झाले आणि त्यात पाच लाख कामगार सामील झाले. कलकत्याला काँग्रेसचं अधिवेशन आणि सर्व पक्षीय अधिवेशन भरले. त्याचवेळी किसान कामगार संघटनाची अखिल भारतीय परिषद तिथंच कम्युनिस्टांच्या प्रेरणेने भरली. श्रमिकानी वर्ग लढा सुरु करणे, जमिनदारी नष्ट करणे, कामाचे तास कमी करणे, किमान वेतन, वृत्तपत्र स्वातंत्र्य, संघटन

स्वातंत्र्य यावर परिषदेने भर दिला."[13]

1928 मध्ये व्हिटले कमिशन भारतात आले तेव्हा कित्येक कामगार संघटनानी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. मार्च 1929 मध्ये मुंबईला गिरणी कामगार संघ व रेल्वे कामगार यांनी एकजूट करून संप घडवून आणला. संपाचे लोण कानपूर नि कलकत्याला पोहचलं. 20 मार्च 1929 रोजी बंडखोरीचा कट केल्याच्या आरोपावरुन देशातील तेहतीस प्रमुख कामगार नेत्यांना अटक झाली. त्यात मुज्झफर अहमद शौकत उस्मानी, श्रीपाद अमृत डांगे, मिरजकर आणि पी.सी.जोशी हे होते. त्यांच्यावर भरलेला खटला मिरत कटाचा खटला म्हणून गाजला आणि 1933 पर्यंत रखडत चालला. एम्.एन्.रॉय यांचेवरही वारंट होते पण ते गुप्त वेषाने देशात वावरत असताना त्यांना अटक झाली या आरोपीना कायद्याची मदत मिळवून द्यायचा प्रयत्न जवाहरलाल नेहरुनी केला. तेव्हा कटात सामील असल्याच्या आरोपाखाली त्यांनाही अटक करण्याचा विचार सरकारने केला पण लोकक्षोभाची भिती वाटल्यामुळे पुढे तो सोडून देण्यात आला.

कामगार चळवळ बहुतेक वेळ कॉंग्रेसला समांतर चालत राहिली. त्यांच्यातले जहाल गट सुद्धा राष्ट्रीय चळवळीत सामील झाले नाहीत. जवाहरलाल नेहरुंनी याबद्दल आत्मचरित्रात लिहीलं "कामगारातील पुढारलेले गट कॉंग्रेसला बिचकत होते. कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांचा त्यांना विश्वास वाटत नव्हता व कॉंग्रेसची तत्वप्रणाली त्यांना प्रतिगामी व बुरसट पांढरपेशा मनोवृत्तीची वाटत होती. कामगारांच्या दृष्टीने विचार करता ती खरोखरच तशी होतीही.

कामगार चळवळीला देशी विदेशी भांडवलदार आणि सरकार असे दोन शत्रू होते. यामुळे नव्याने संघटित झालेल्या गरीब मजूरांचा फार काळ टिकाव लागला नाही. त्यांच्या चळवळीला

किंवा संपाला म्हणण्यासारखं यश कमी वेळा मिळाल. तरी सुद्धा चळवळीचं वातावरण तापवणं आणि राष्ट्रीय संघर्षाला एक बाजूही आहे. याची जाणीव करणे या दृष्टीने नवजात चळवळीने मोलाची कामगिरी बजावली."[14]

"दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतीय साम्यवाद्यांनी या युद्धाला साम्राज्यवादी संबोधून त्याचा निषेध केला. मात्र जेंव्हा जर्मनीने सोव्हिएत रशियावर आक्रमण केले आणि रशिया जेंव्हा इंग्लंड, अमेरिका देशाचा मित्र बनला. तेव्हा लगेच दुसरे महायुद्ध हे लोकयुद्ध आहे असे सांगून साम्यवादी पक्षाने त्या युद्धात इंग्रज राज्यकर्त्यांना जनतेने सहकार्य करावे असा प्रचार सुरु केला. तेव्हापासूनचा स्वातंत्र्य आंदोलनाच्या मुख्य प्रवाहापासून साम्यवादी फेकले गेले."[15]

1948-49 च्या काळात भारतीय साम्यवाद्यांनी हिंसक आंदोलनाचे राजकारण केले. सर्व महत्त्वाच्या शहरांमध्ये दंगली घडवून आणणे, रेल्वे व पोस्टखाते यात संप करवून अशांतता निर्माण करणे असे प्रकार केले. प.बंगाल, मद्रास, त्रावणकोर वगैरे राज्यात पक्षांच्या शाखांवर बंदी घालण्यात आली होती.

कॉंग्रेसपक्ष ब्रिटीश साम्राज्यशाहीचे धोरण जोपासतो व तो लोकशाहीच्या आणि लोक हिताच्या विरोधात आहे असे आरोप श्रमिक, लहान शेतकरी, कष्टकरी, बुद्धीजिवी व राष्ट्रीय बुझर्वा या सर्वांनी कॉंग्रेस संघटित होण्याच्या साम्यवादी पक्षाने आपल्या पहिल्या जाहिरनाम्यात केले.

"15 ऑगस्ट 1947 चे सतांतर व नव्या राजसत्तेने स्विकारलेले भांडवलशाही विकासाचे धोरण याचे मुल्यमापन करुन या सत्तेचे वर्गीय स्वरुप ठरविणे आणि वास्तव परिस्थितीनुसार कार्यक्रम तयार करण्याचा प्रश्न भारतीय कम्युनिस्ट पक्षासमोर राहिला. असा कार्यक्रम करण्यासाठी एका

दशकाहून अधिक काळ पक्षांतर्गत तीव्र वैचारिक संघर्ष झाला."[16]

**<u>पक्षांतर्गत वैचारिक संघर्ष</u> :-**

पक्षांतर्गत वैचारिक संघर्षाची 1948 साली कलकत्ता येथे भरलेल्या दुसऱ्या पक्ष काँग्रेसपासून झाली. या काँग्रेसमध्ये वैचारिक मतभेदामुळे पक्ष कार्यक्रमावर एकमत होऊ शकले नव्हते. म्हणून पक्षाचे प्रतिनिधीमंडळ सोव्हिएट युनियनला गेले आणि स्टॅलिनबरोबर झालेल्या चर्चेनुसार पक्ष कार्यक्रमाची व डावपेचाची भूमिका ठरविण्यात आली. परंतु हा कार्यक्रम तीनच वर्षात वादग्रस्त बनला.

नेमक्या याच काळात आंतरराष्ट्रीय तसेच अंतर्गत परिस्थितीतील बदलामुळे भारत सरकारने आपल्या परराष्ट्रीय धोरणात बदल केला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात सार्वजनिक क्षेत्र उभारणे, जमिन सुधारणांची अमंलबजावणी करणे यावर भर दिला आणि जनतेचा पुरोगामी कल पाहून काँग्रेसने "आवाडी" अधिवेशनात "समाजवादी समाज रचना" हे ध्येय स्विकारले. या काँग्रेसच्या धोरणामुळे कम्युनिस्ट पक्षात निर्माण झालेला संघर्ष अधिक तीव्र करण्यास कारणीभूत झाला. या धोरणाचा आधार घेवून पक्ष नेतृत्वाला एका गटाने राष्ट्रीय भांडवलदार वर्ग असे दोन विभागात विभागला आहे असा युक्तीवाद करून नेहरु सरकारच्या धोरणांचे समर्थन केले पाहिजे' पण पक्षाच्या मध्यवर्ती कमिटीच्या बैठकीत हे धोरण फेटाळले गेले.

ऑक्टोबर 1962 मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. डांगेवादी गटासह विरोधी पक्ष केंद्र सरकारच्या पाठिशी उभे राहिले. बसु, सुंदरय्या प्रभृती नेत्यांनी पक्ष कार्यकारणी सदस्यत्वाचा राजीनामा दिला. समाजवादी पक्ष आक्रमण करुच शकत नाही. तेव्हा चीनचा निषेध करण्याचा प्रश्न

उद्भवत नाही. अशी त्यांची भूमिका होती. जहालांच्या या भूमिकेमुळे भारतीय कम्युनिस्ट पक्षाची प्रतिमा डागाळली. तर बंगालच्या प्रांतिक कार्यकारिणीने डांग्यानी ब्रिटीश सरकारला 1942 साली तुरुंगातून पाठविलेली क्षमापत्रे प्रकाशित केली. ही पत्रे बनावट असल्याचा ठराव राष्ट्रीय परिषदेच्या ज्या बैठकीत केला. तिच्यावर जहालवाद्यांनी बहिष्कार घातला. बंडखोरांवर पक्ष विरोधी कारवायांचा ठपका ठेऊन त्यांना राष्ट्रीय परिषदेने पक्षांतून काढले.

## <u>कम्युनिस्ट पक्षात फूट</u> :-

"पक्षामध्ये निर्माण झालेलया वैचारिक संघर्षामुळे कम्युनिस्ट पक्षांत फूट अटळ होती. कारण डांग्यांच्या वर्गसमन्वयवादी धोरणामुळे क्रांतीकारक मार्गावर विश्वास ठेवणारा पक्षातील एक गट असंतुष्ट होता. त्यामुळे पक्षात दुफळी पडली होती. पक्षातील दुफळी नष्ट करण्यासाठी जे पर्याय समोर ठेवण्यात आले होते. ते स्विकारुन कोणतीही तडजोड करण्यास हा गट तयार नव्हता. त्यामुळे पक्षात गंभीर तणाव होता. यामुळे 11 एप्रिल 1964 च्या कौन्सिलच्या बैठकीत 32 सभासदांनी सभात्याग केला होता."[17]

## <u>मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष</u> :-

"7 जुलै ते 12 जुलै तेनाली (आंध्र प्रदेश) या पक्षाची स्थापना झाली. 8 सप्टेंबर पासून लोकसभेच्या 11 साम्यवादी सदस्यांनी ए.के.गोपालन यांच्या नेतृत्वाखाली आपला वेगळा गट घोषित केला. 1964 साली चीनवादी गटाने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला. या मार्क्सवादी डाव्या पक्षाचे नेतृत्व श्री.नंबुद्रीपाद, श्री.ज्योती बसू, श्री.गोपालन, श्री.पी.सुंदरय्या,

बी.टी.रणदिवे, श्री.एच.के.सुरजित, आहिल्याबाई रांगणेकर इ.साम्यवादी नेत्यांकडे होते.

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांची ध्येयधोरणे व उद्दिष्टे :-

### I) राज्यरचनेच्या क्षेत्रातील धोरण -

जनतेचा लोकशाही भारत हे भारतातील भिन्न भिन्न गटांच्या जनतेचे संघराज्य असेल. स्वायत्तता नाकारुन केंद्रीकरण करण्याची जी मोहिम राज्यकर्त्या वर्गानी सुरु केली आहे. तिला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा विरोध आहे. तसेच सर्व प्रकारच्या विभाजन राज्यवादी चळवळींनाही पक्षाचा विरोध आहे.

त्यासाठी पुढील प्रकारे लोकशाही राज्य रचनेचा विकास करुन घेण्यासाठी तो कार्यरत आहे.

"1)भारतीय संघराज्य हे लोकशाही मध्यवर्तीतत्वावर आधारलेले संघात्मराज्य राहील.

2) जनता सार्वभौम असून राज्यसत्तेची सर्व अंगे जनतेस उत्तरदायी असतील. प्रतिनिधी प्रौढ मताधिकार आणि प्रमाणशिर प्रतिनिधीत्वाचे तत्व व या आधारे निवडलेले असतील आणि त्यांना निवडूण देणाऱ्या बहूसंख्य मतदारांनी तशी मागणी केल्यास त्यांचे प्रतिनिधीत्व रद्द केले जाईल. सर्व निवडणूकांसाठी मतदान करण्याचा अधिकार 18 वर्षापासून असेल.

3) अखिल भारतीय केंद्रात लोकसभा व राज्यसभा ही दोन सभागृहे असतील. या दोन्ही गृहाना सारखे अधिकार राहतील. उभय गृहाच्या निर्णयानुसार राष्ट्रपती काम करतील.

4) भारतीय संघराज्यातील सर्व राज्यांना स्वायतता व समान अधिकार असतील.

5) घटक राज्यांमध्ये वरिष्ठ सभागृहे असणार नाहीत.

6) संसदेत आणि केंद्रीय शासनात सर्व राष्ट्रीय भाषांची समानता मान्य केली जाईल.

7) खेडयापासून वरपर्यंत स्थानिक संस्थाचे विस्तृत जाळे जनतेचे लोकशाही सरकार तयार करेल.

8) न्यायदानाच्या कारभारात लोकशाही बदल करता येतील. अविलंब व निष्पक्षपाती न्यायाची हमी देण्यात येईल.

9) एक मूलभूत हक्क म्हणून कामाच्या हक्कांची प्रत्येक नागरिकाला हमी असेल.

10) स्त्रियांना भोगावी लागणारी सामाजिक विषमता आणि अन्याय दूर करणे, नोकरी व विविध व्यवसायामध्ये समान संधी असेल.

11) राज्यसंस्थेच्या कामात धर्मातीत स्वरुपाची हमी राहील. अल्पसंख्याक, धार्मिक जमातींना संरक्षण दिले जाईल.

12) नव्या पुरोगामी जनसंस्कृतीचे स्वरुप सरंजामशाहीविरोधी, साम्राज्यशाहीविरोधी आणि लोकशाहीनिष्ठ असे असेल.

II) <u>शेतीच्या आणि शेतकरी प्रश्नांच्या क्षेत्रात</u> -

1) जमिनदारी विनामोबदला नष्ट करणे आणि शेतमजूरांना व गरीब शेतकऱ्यांना विनामूल्य जमिन वाटून देणे.

2) सावकारांचे आणि जमिनदारांचे जे कर्ज शेतकरी, शेतमजूरांच्या वरती आहे ते सर्व रद्द करणे.

3) शेतकऱ्यांना आणि कारागिरांना दीर्घमुदतीच्या आणि अल्प व्याजाच्या कर्जाची सोय करुन देणे.

4) शेतमजूरांना पुरेशा पगाराची आणि राहण्याची शाश्वती देणे.

5) पाटबंधाऱ्यांच्या खात्रीलायक सोयी उपलब्ध करुन देणे.

## III) <u>उद्योग आणि कामगार क्षेत्रात</u> -

शेतकऱ्यांच्या निकृष्ट अशा क्रयशक्तीपासूनच केवळ नव्हे तर परदेशी भांडवलाच्या लूटीपासूनही आपल्या उद्योगधंदयाचे नुकसान होत असते. व्यापक प्रमाणावर औद्योगिकरण झाल्याखेरीज आपला देश सामर्थ्यवान व संपन्न होणार नाही.

1) मळे, खाणी, तेलशुद्धीकरणाचे कारखाने, जहाज वहातूक आणि व्यापार यामध्ये असलेले सर्व परदेशी भांडवल ताब्यात घेणे, बँका, मक्तेदारी उद्योग यांचे राष्ट्रीयकरण करणे.

2) देशातील आर्थिक परावलंबित्व दूर करण्यासाठी आणि उद्योगधंदयाची वाढ करण्यासाठी सरकारी मालकीच्या क्षेत्रात वेगाने विकास करणे.

3) छोटया व मध्यम प्रतीच्या उद्योगांना कर्जाची सोय उपलब्ध करुन देवून कच्च्या मालाला वाजवी किंमतीत पुरवठा करुन आणि माल बाजारपेठेत आणण्याच्या सोयीबाबत मदत करुन साहाय्य करणे.

4) जनतेच्या हिताच्या दृष्टीने देशाचा समतोल आणि योजनाबद्ध विकास घडून यावा यासाठी अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचे नियमन आणि एकसूत्रीकरण करणे.

5) कामगारांच्या राहण्याच्या आणि कामाच्या सोयी यात मूलभूत सुधारणा करणे. जीवन वेतन ठरवून देणे, कामाचे तास कमी करणे, कामगारांसाठी चांगल्या घरांची सोय इ.बाबतीत सुधारणा करणे.

6) सामान्य जनतेच्या हिताचे किंमतविषयक धोरण परिणामकारक रितीने अमंलात आणणे.

7) शेती, उद्योग, व्यापार या क्षेत्रात क्रमाने वाढणारा कर लावला जाईल व नफ्याचे नियंत्रण केले जाईल आणि त्याचबरोबर कामगार शेतकरी आणि कारागीर यांना कर आकारणीत अधिक सवलती दिल्या जातील.

IV) <u>परराष्ट्रीय धोरणाच्या क्षेत्रात</u> -

जागतिक शांततेचे रक्षण, शांततामय सहजीवन आणि वसाहतवादास विरोध या कामी भारताने आपली न्याय भूमिका पार पाडावी याची खात्री करण्यासाठी जनतेच्या लोकशाही सरकार खालील गोष्टी करील.

1) हर प्रकारे आफ्रिकी - आशियायी ऐक्य बळकट करणे, स्वातंत्र्य आणि शांतता यांच्या रक्षणासाठी समाजवादी देशांबरोबरचे आणि शांतताप्रेमी राष्ट्रांबरोबरचे स्नेहसंबंध आणि सहकार्य अधिक दृढ करणे साम्राज्यशाहीविरुद्ध सर्व वसाहती राष्ट्रांच्या लढयांना पाठिंबा देणे.

2) पंचशीलच्या आधारे वेगवेगळया समाजव्यवस्थांच्या देशांत शांततामय सहजीवन टिकावे म्हणून

झटणे.

3) अण्वस्त्र क्षेपणास्त्रांच्या युद्धाच्या भयातून मानवीजातीस मुक्त करण्यासाठी इतर शांतताप्रेमी शक्तींच्या सहकार्याने स्वत:स शक्य ते सर्व करणे, अणवस्त्रे आणि समूहहत्येची इतर अस्त्रे यांच्या चाचणीवर पैदाशीवर आणि तत्काळ बंदी घालण्याची मागणी करणे आणि अण्वस्त्राच्या सर्व साठयांचा नाश करावा म्हणून प्रयत्न करणे, अण्वस्त्र-मुक्त सर्व प्रदेशांबाबत करार व्हावेत म्हणून झटणे.

4) युद्ध टाळण्यासाठी, शांतता राखण्यासाठी आणि ती बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे. सार्वत्रिक आणि नियंत्रित नि:शस्त्रीकरणाचा करार व्हावा म्हणून झटणे. सर्व लष्करी करारांचे आणि परदेशी लष्करी तळांचे विसर्जन करण्याची आणि सर्व देशांतून फौजा काढून घेण्याची मागणी करणे, साम्राज्यवादी युद्धखोर आणि त्यांची कारस्थाने व हालचाली याबाबत अत्यंत जागरुक राहणे आणि जनतेत ही तसा जागरुक बाणा निर्माण करणे.

5) ब्रिटीश राष्ट्रकुलातून भारताला बाहेर आणणे. राष्ट्रहिताशी किंवा स्वाभिमानाशी विसंगत असलेले ब्रिटन-अमेरिकेबरोबरचे सर्व संबंध रद्द केल्याचे जाहीर करणे.

6) पाकिस्तान, नेपाळ, सिलोन, ब्रम्हदेश आणि चीन या भारताच्या शेजारी असलेले विद्यमान मतभेद आणि तंटे पंचशीलाच्या आधारे मिटविण्यासाठी आणि त्यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी सतत प्रयत्न करणे."[18]

**<u>भारतीय कम्युनिस्ट पक्ष</u> :-**

साम्यवादी पक्षात जो रशियावादी गट होता तो भारतीय कम्युनिस्ट पक्ष म्हणून स्थापन झाला. त्याला उजवा कम्युनिस्ट पक्ष असे संबोधले होते. या पक्षाचे नेतृत्व श्री.एस.ए.डांगे, रोझा देशपांडे, श्री.पी.सी.जोशी, मोहन कुमारमंगलम, श्री.भूपेश गुप्ता, श्री.एस.जी.सरदेसाई इ.नेत्याकडे होते. या पक्षांची स्थापना 1964 साली झाली.

**<u>भारतीय कम्युनिस्ट पक्षाची ध्येयधोरणे व उद्दिष्टे</u> :-**

1. 42 व्या घटना दुरुस्तीमध्ये सुधारणा करुन व्यक्ती स्वातंत्र्य विरोधी कलमे रद्द करणे.
2. किंमती स्थिर ठेवणे, त्यासाठी जीवनावश्यक वस्तूंच्या घाऊक व्यापारावर नियंत्रण ठेवणे.
3. अर्थ व्यवस्थेत सुधारणा करुन रोजगार वृद्धी करणे, कामगार शेतमजूर यांना किमान वेतन मिळवून देणे, शेतमालाला योग्य भाव मिळणे, वेठबिगार पद्धती नष्ट करणे या दृष्टीने
4. स्त्रियांना समाज दर्जा देणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी करणे विद्यार्थी (युवक) व शिक्षक यांना काम करण्याचा हक्क देणे.
5. मागासलेल्या जाती जमातींना, हरिजनांना, मुस्लिमांना त्यांच्या हक्काविषयी संरक्षण देणे.
6. परराष्ट्र संबंध प्रस्थापित करुन साम्राज्यशाहीला विरोध करणे, सोव्हिएट रशियाशी मैत्रीचे संबंध वाढविणे."[19]

**<u>कम्युनिस्ट पक्षाचे भारतीय राजकारणातील स्थान</u> :-**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना 26 डिसेंबर 1925 साली कानपूर येथे झाली. त्याग आणि संघर्ष, स्वातंत्र्य आंदोलनात पुढाकाराने मांडलेले कार्यक्रम, वर्गसंघर्षाचे आधारे उभारलेल्या जनसंघटना, मार्क्सवाद लेनिनवादी तत्वज्ञानाचा प्रचार व कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीयत्वाचा अमंल याबाबत पक्षाचा इतिहास गौरवशाली आहे. ब्रिटीश व कॉंग्रेस सत्तेत असताना कम्युनिस्ट पक्षनेत्यांनी कार्यकर्त्यांनी भयानक छळाला तोंड दिले आहे.

"भारताच्या स्वातंत्र्य लढयात श्रमजीवी वर्गाचे वर्चस्व वाढत होते. याची ब्रिटीश साम्राज्यवाद्याइतकीच भारतीय प्रस्थापित वर्गांना विशेषता याच स्वातंत्र्य आंदोलनात पुढारीपणा करणाऱ्या नवोदित भांडवलदारांच्याव प्रतिनिधीनाही भिती वाटत होती. त्यामुळे लोकबळाचा हा वाढता प्रभाव कमी करावा. निदान आपल्या आवाक्याबाहेर जाणार नाही. याची दक्षता ते घेत आले होतेच आणि निखळ श्रमजीवी वर्गाचे नेतृत्व आखिल भारतीय पातळीवर प्रभाव पाडू शकेल इतके विकसित झाले नव्हते. परिणामी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात समाजवादी व सहिष्णू नेतृत्व निर्णायक पोहचले नाही. त्यामुळे ठिकाणी जर तर संदर्भ घालून लोकमनातील सर्व उच्च ध्येयवादी भूमिकांना अनेक विकासाच्या योजनांच्या गर्दीत मिसळून टाकण्यात आले."[20]

1954 च्या निवडणुकीपासून सत्ताधारी कॉंग्रेस पक्ष हा अल्पमताचे प्रतिनिधीत्व करणारा राज्यकर्ता आहे हे वास्तव निर्माण झाले. एवढेच नव्हे तर 1957 मध्ये केरळ राज्यात प्रथम कॉंग्रेस ऐवजी कम्युनिस्ट पक्षाकडे सत्ता मिळविण्याइतके प्रतिनिधींचे संख्याबळ आले.

भारतीय राजकारण भारतीय कम्युनिस्ट पक्षांनी लोकसभा निवडणूकांमध्ये प्राप्त केलेल्या जागांचा आढावा. या आढाव्यावरुन भारतीय राजकारणात कम्युनिस्ट पक्षाचे स्थान समजून येईल.

**1952 ते 1984 पर्यंतच्या लोकसभा निवडणूकांचे निकाल**

| राजकीय पक्ष | 1952 | 1957 | 1962 | 1967 | 1971 | 1977 | 1980 | 1984 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| काँग्रेस पक्ष | 364 | 371 | 361 | 283 | - | - | - | - |
| काँग्रेस सत्तारुढ | - | - | - | - | 350 | 154 | 353 | 403 |
| काँग्रेस (सं) पक्ष | - | - | - | - | 16 | - | - | - |
| स्वतंत्र पक्ष | - | - | 18 | 44 | 8 | - | - | - |
| जनसंघ | 3 | 4 | 14 | 35 | 22 | - | - | - |
| किसान मजदूर प्रजा पक्ष | 9 | - | - | - | - | - | - | - |
| प्रजासमाजवादी पक्ष | - | 19 | 12 | 13 | 2 | - | - | - |
| समाजवादी पक्ष | 12 | - | - | - | - | - | - | - |
| सं.समाजवादी पक्ष | - | - | - | 23 | 3 | - | - | - |
| जनता पक्ष | - | - | - | - | - | 270 | ज. 42<br>ज.31 | 10 |
| भारतीय कम्यु.पक्ष | 16 | 27 | 29 | 23 | 23 | 7 | - | 6 |
| मार्क्स.क.पक्ष | - | - | - | 19 | 25 | 22 | 36 | 22 |
| लोकशाही काँग्रेस पक्ष | - | - | - | - | - | 28 | - | - |
| द्रमुक पक्ष | - | - | 7 | 25 | 23 | 1 | 16 | - |
| अण्णा द्रमूक | - | - | - | - | - | 19 | 2 | 12 |
| तेलगू देसम | - | - | - | - | - | - | - | 30 |
| इतर पक्ष | 44 | 34 | 36 | 20 | 30 | 32 | 36 | 25 |
| अपक्ष | 41 | 39 | 20 | 35 | 13 | 8 | 12 | 7 |
| एकूण | 489 | 494 | 497 | 520 | 515 | 541 | 528 | 515 |

## 1989 च्या लोकसभा निवडणूकींचे निकाल

लोकसभेच्या एकूण 544 जागांपैकी 525 जागांसाठी निवडणूक झाली.

| अ.क्र. | पक्षाचे नाव | जागा | अ.क्र. | पक्षाचे नाव | जागा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | काँग्रेस पक्ष | 193 | 13. | क्रांतीकारी समाजवादी पक्ष | 4 |
| 2. | अण्णा द्रमुक पक्ष | 11 | 14. | फॉरवर्ड ब्लॉक | 3 |
| 3. | मुस्लीम लीग | 2 | 15. | इंडियन पीपल्स फ्रंट | 1 |
| 4. | केरळ काँग्रेस पक्ष | 1 | 16. | मार्क्सिस्ट को.ऑर्डिनेशन कमिटी | 1 |
| 5. | ऑल इंडिया कम्यु.पार्टी | 1 | 17. | अकाली दल (मान) | 6 |
| 6. | नॅशनल कॉन्फरन्स | 3 | 18. | बहुजन समाजपार्टी | 3 |
| 7. | जनता दल | 141 | 19. | म.गो.पक्ष | 1 |
| 8. | भाजप | 88 | 20. | तेलगू देसम | 2 |
| 9. | शिवसेना | 4 | 21. | काँग्रेस (स) | 1 |
| 10. | हिंदू महासभा | 1 | 22. | सिक्कीम प्रजा परिषद | 1 |
| 11. | मा.क.प. | 32 | 23. | इत्तर छोटे पक्ष आणि अपक्ष | 13 |
| 12. | भा.क.प. | 12 | | | |

"1998 च्या निवडणूकीत विविध पक्षांना मिळालेल्या जागा (1) भाजप 180 (2) अ.द्रमूक 19 (3) एम.डी.एम.के.04, (4) पी.एम.के. 3 (5) राजीव काँग्रेस 01, (6) जनता पक्ष 01 (7) समता पक्ष 12 (8) शिवसेना 06 (9) अकाली दल 10 (10) बिजू जनता दल 08, (11) तृणमूल

काँग्रेस 07, (12) हरियाणा विकास पार्टी 01, (13) काँग्रेस 01, (14) रिपब्लीकन पक्ष 04, (15) मुस्लीम लीग 02, (16) केरळ काँग्रेस 01, (17) मा.क.प.32, (18) भा.क.प. 09, (19) फॉरवर्ड ब्लॉक 05 (20) आर..एस.पी.04, (21) समाजवादी पक्ष 20 (22) राष्ट्रीय जनता दल 17 (23) जनता दल 6, (24) द्रविड मुनेत्र कलघम 06, (25) तामिळ मनिला काँग्रेस 03, (26) तेलगू देसम पार्टी 12 (27) नॅशनल कॉन्फरन्स 02, (28) अरुणाचल काँग्रेस 02, (29) बहुजन समाज पार्टी 05, (30) हरियाना लोकदल 04, (31) इतर छोटे पक्ष व अपक्ष 16."[21]

"1952 पासून मात्र या साम्यवादी पक्षाने आपल्या धोरणात बदल केला. 1952 च्या लोकसभेच्या निवडणूकीत साम्यवादी पक्षाला 26 जागा मिळाल्या. तर 1957 च्या सार्वत्रिक निवडणूकीत या पक्षाला 29 जागा मिळाल्या आणि 1962 च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत साम्यवादी पक्षाला 34 जागा मिळाल्या. अशा प्रकारे साम्यवादी पक्षाने भारतीय राजकारणात हळूहळू पाय रोवण्यास सुरुवात केली."[22] पण साम्यवादी पक्षात चीनच्या आक्रमणाच्या संदर्भात मतभेद निर्माण झाले. आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष अशा दोन पक्षांची निर्मिती 1964 मध्ये झाली.

1967 सालच्या लोकसभेच्या निवडणूकीत या दोन्ही पक्षांनी भाग घेतला. या निवडणूकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला 25 जागा तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाला 23 जागा मिळाल्या होत्या. 1989 च्या लोकसभेच्या निवडणूकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला 32 जागा तर भा.क.पक्षाला 12 जागा मिळाल्या. 1998 साली मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष 32 व भारतीय कम्युनिस्ट पक्ष 09 जागा मिळाल्या.

मा. क. प. चा प्रभाव आता पश्चिम बंगाल, त्रिपूरा व केरळ या तीन राज्यांपुरताचा

मर्यादित राहिला आहे. भारतातील कम्युनिस्ट पक्षाचा पाया संकुचित असून त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ होताना दिसत नाही. हे असे का होत आहे याचा पक्षाच्या नेतृत्वाने गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

1948-49 च्या काळात भारतीय साम्यवाद्यांनी हिंसक आंदोलनाचे राजकारण केले. 1952 नंतर कम्युनिस्ट पक्षाने सनदशीर मार्गाने भारतीय राजकारणात प्रवेश केला. 1964 च्या पक्ष फूटीपूर्वी कम्युनिस्ट पक्ष लोकात स्थान निर्माण करू लागला होता. पण भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्यातील वैचारिक मतभेद व पक्ष फुटीनंतर वाढलेली स्पर्धा ही नक्कीच पक्षाला काही प्रमाणात मागे खेचण्यात कारणीभूत झाली आहे.

स्वाभाविकता वरील लोकसभा निवडणूकांचे निकाल पाहीले असता असा निष्कर्ष काढता येईल की दोन्ही पक्षाची भारतीय राजकारणात पिछेहाट झाली आहे. दोन्ही पक्षांत वैचारिक मतभेद आहेत. या मतभेदामुळे दोन्ही पक्ष एकत्र येत नाहीत. साहजिकच भारतीय राजकारणात प्रभावी स्थान दोन्ही कम्युनिस्ट पक्ष करू शकले नाहीत. दोन्ही पक्षांना भारतीय राजकारणात स्थान निर्माण करावयाचे असेल तर दोन्ही पक्षानी एकत्र यावे किंवा किमान कार्यक्रमांवर दोन्ही पक्षांनी आघाडी निर्माण केल्यास एक प्रभावी राजकीय शक्तीचा उदय होण्यास कारणीभूत ठरेल.

## : संदर्भ :


1. प्रा.बी.बी.पाटील, भारतीय शासन व राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पा.नं.195

2. प्रा.बी.बी.पाटील, भारताचे शासन व राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पा.नं.195

3. प्रा. चिं. ग. घांग्रेकर, भारतीय राजकीय व्यवस्था, मुंजे पब्लिशर्स, नागपूर, 1995 पा. नं. 107

4. प्रा. बी. बी. पाटील, शासकीय यंत्रणा, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पा. नं. 224

5. प्रा. बी. बी. पाटील, शासकीय यंत्रणा, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पा. नं. 224

6. प्रा. बी. बी. पाटील, शासकीय यंत्रणा, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पा. नं. 225

7. भा.ल.भोळे, भारतीय संविधान सिद्धांत आणि व्यवहार, पा. नं. 198

8. भा.ल.भोळे, भारतीय संविधान सिद्धांत आणि व्यवहार, पा. नं. 198

9. भा.ल.भोळे, भारतीय संविधान सिद्धांत आणि व्यवहार, पा. नं. 198

10. भा.ल.भोळे, भारतीय संविधान सिद्धांत आणि व्यवहार, पा. नं. 220

11. भा.ल.भोळे, भारतीय संविधान सिद्धांत व व्यवहार, पा.नं. 220

12. शिरीष सहस्त्रबुद्धे, बखर काँग्रेसची, राजहंस प्रकाशन, पुणे, पा.नं.198

13. शिरीष सहस्त्रबुद्धे, बखर काँग्रेसची, राजहंस प्रकाशन, पुणे, पा.नं.199

14. शिरीष सहस्त्रबुद्धे, बखर काँग्रेसची, राजहंस प्रकाशन, पुणे, पा.नं.199

15. प्रा.भा.ल.भोळे, भारतीय संविधान, सिद्धांत व व्यवहार, पा.नं.220

16. डॉ.विठ्ठल मोरे, महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, कैलास पब्लिकेशन, औरंगापूरा, औरंगाबाद, पा.नं.54

17. डॉ.विठ्ठल मोरे, महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, कैलास पब्लिकेशन, औरंगापूरा, औरंगाबाद, पा.नं.67

18. डॉ.विठ्ठल मोरे, महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, कैलास पब्लिकेशन, औरंगापूरा, औरंगाबाद, पा.नं. 253 ते 261

19. प्रा. बी. बी. पाटील, भारताचे शासन व राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पा.नं.211

20. आचार्य शांताराम गरुड, लोकशाही सिद्धांत -प्रकार आणि व्यवहार, समाजवादी प्रबोधिनी प्रकाशन, इचलकरंजी, पा. नं. 35

21. डॉ.अशोक चौसाळकर, बारावी लोकसभा निवडणूक, समाजवादी प्रबोधिनी प्रकाशन इचलकरंजी, पा. नं. 23

22. प्रा. बी. बी. पाटील, भारताचे शासन व राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पा.नं.210

****